## असुरक्षितता

त्या ओळखीच्या भीतीचे विस्मरण झाले होते
अटळ आणि रोजचे ते पण, मरण बरे होते

सतत ओलांडल्या होत्या लक्ष्मणरेषा तेव्हा
रानात हरवलेले ते पण, हरीण खरे होते

प्रकाश-वेगापेक्षा पुढे धावणारी आयुष्यं
त्यांना पण वर्तमानाचे ते, सरपण पुरे होते

भीतीच्या वाटेवर कुंपणाच्या भिंतीपल्याड
अदृश्य उगवले ते पण, वळण अंधारे होते

गेले कुठे जगणे आणि स्वाभाविक मरणें
उद्या नको वाटण्याचे ते पण, कारण बुरे होते

**-------संध्या रानडे**